मन वढाय वढाय

स्फुट लेख संग्रह



डॉ. अशोक सदाशिव नेने

ईशान प्रकाशन नागपूर
२०२०

मन वढाय वढाय

सूची पत्र


क्रमांक	विषय	पृष्ठ
	मुखपृष्ठ	
	विषय सूची	अ
०	प्रस्तावना	०१
१	ढाई अक्षर ज्ञानका	०३
२	हिंदु धर्मातील चार आश्रम	०४
३	मानवी पंचेद्रिये- आपले विज्ञान शिक्षक	०५
४	भारतीय ज्योतिष व त्याची उपयुक्तता	११
५	सैया निकस गये – मै ना लढी थी	१३
६	मला उमगलेला कबिर	१५
७	कोरोना- एक इष्टापत्ती	१९
८	महाभारतांतील गोष्टी – कालच्या आणि आजच्या	२२
९	जीवन मरण एका श्वासाचे अंतर	२३
१०	डोळा –एक अदभुत कॅमेरा	२४
११	संस्कृत शब्दकोशातील पंचांगे	२५
१२	अथ: कर्णपुराण	२९
१३	गज़ल –मला भावलेली व उमगलेली	३१
१४	मानवी शरिराशी निगडीत म्हणी व वाक्प्रचार	३४
१५	शिल्पशास्त्राशी निगडीत मराठी म्हणी व वाक्प्रचार	३८
	पार्श्व पृष्ठ	

प्रस्तावना

महाराष्ट्रातील एक थोर , अशिक्षित पण प्रतिभासंपन्न , कवियत्री बहिणाबाई हीची मन वढाय वढाय ही काव्यरचना. कवियत्री सांगते ,

मन एव्हड एव्हड, जस खसखसच दान ।
मन केव्हड केव्हड आभायतबि मावेन ॥

मन अतिचंचल ,क्षणात इथे तर क्षणात सात समुद्रापलिकडे , साप विंचवाच्या विषाला उपचार आहेत पण मनाचे काय ? मनाची उत्पती मेंदुत आणि तो तर झोपेत सुध्दा कार्यरत असतो. झोपेतसुध्दा तो नविन नविन स्वप्ने दाखवतो. काही स्पप्ने भविष्यसूचक असतात , दिवंगत नातेवाईकांची भेट घडवतो. स्वप्नांवरून भविष्य सांगण्याचेसुध्दा शास्त्र आहे. मेंदु हे माणसाला ईश्वराने दिलेले वरदान आहे अन्यथा माणसात व पशुपक्षात फरक उरला नसता.



मेंदु लक्षावधी गोष्टीची नोंद ठेवतो. जन्मल्या जन्मल्या बाळ आपल्या आईचा स्पर्श , आवाज व नंतर चेहरा ओळखु लागतो . मेंदुची वाढ पहिल्या आठ वर्षापर्यंत पुर्ण होते असे शास्त्रज्ञ सागतात. त्यातही डावा मेंदु व उजवा मेंदु असा भेद आहे. कोणाचा डावा मेंदु अधिक कार्यक्षम असतो.

वृध्दत्व आले की एक एक अंग काम करेनासे होतात , केस गळणे पांढरे होणे , दृष्टी दोष होणे , ध्वनीग्रहण शक्ती क्षीण होणे वगैरे , मात्र मेदु अखेर पर्यंत कार्यक्षम असतो. डोळे , कान, तोंड इच्छेनूसार बंद करता येतात पण मेंदुचे काय? म्हणून एक कवी म्हणतो; *गोली मार भेजेको, भेजा शोर करता है.*

कमकुवत मनाच्या व्यक्ती दुस-या वाईट विचाराच्या व्यक्तीच्या प्रभावाखाली चटकन येतात , जाळपोळ, दंगल, देशविघातक कार्य करायला तयार होतात.म्हणून मन ताब्यात ठेवले तर सर्व इंद्रिये ताब्यात ठेवता येतात.

आजच्या दूरदर्शन व भ्रमणध्वनी यंत्राच्या युगात आपण वाचन चिंतन मनन करायचे विसरलो आहोत. दोन डोळे शेजारी , भेट नाही संसारी त्याप्रमाणे आपण आपल्याच घरातल्या माणसांशी सलग १५ मिनिटे तरी बोलतो का ? किंवा शेजा-याशी किती आठवडयापूर्वी बोललो होतो ते आठवून पहा.

यावर एक उपाय म्हणून आपल्याशीस आपण बोलण्याचा प्रयत्न करून पहा. आरशात पाहून आपल्याशीच बोला, दिवसाच्या शेवटी किमान एक पान लिहून मन मोकळे करून पहा. तुम्हाला नवनविन विचार सुचतील, स्मरणशक्तीला चालना मिळेल. कांही चांगले विचार इतरांशी सामायिक करा, त्याना फालतु वाटले तरी .

१ ढाई अक्षर ज्ञानका

लहानपणी काही अक्षरांबद्दल कुतुहल असे , जसे प्रेम. "प्रेम याने ढाई अक्षर प्यारका "असे संत कबिराने सांगितले आहे. कालानुसार , परिस्थितीनूसार त्याचे संदर्भ बदलतात असे लक्षात आले.

काहींचे देशप्रेम इतके जाज्वल्य होते की ते देशासाठी हसतहसत फासावर चढले तर काहींचे सत्ताप्रेम इतके की सत्तेसाठी देशाची फळणीसुध्दा मान्य केली. सत्तेत असताना देशप्रेमाचे गोडवे गाणारे सत्ता जाताच आतंकवादाची भाषा बोलू लागले.

मातृप्रेम, पितृप्रेम आईवडलांच्य वाढत्या वयाबरोबरच कमी होत जाते.वृध्दाश्रम आधुनिक काळाची गरज आहे असे वाटू लागते. पैत्रिक संपत्तीसाठी बंधुप्रेम , भगिनीप्रेम कोर्टात वितळून जाते. वात्सल्यभाव आता केवळ पशूपक्षातच बघायचा.

"घर असावे घरासारखे नकोच नुसत्या भिंती , तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोच नुसती नाती "असे विचार केवळ कवितेपूरते शिल्लक राहतात.

असेच पण दुसरे भारदस्त अक्षर "पीएचडी" किंवा ढाई अक्षर ज्ञानका.पूर्वी संशोधनची आवड असणारेचे त्याची वाट धरायचे.पण आताच्या शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे असे पदवीधारक हजारोनी दिसतात. केवळ संशोधक व त्याचा मार्गदर्शक या दोघानाच माहित असतो तो संशोधनाचा विषय. दहा वर्षात पंधरा विद्यार्थ्याना (?) अशी पदवी मिळवून देणारे सर्वज्ञ प्रत्येक विश्वविद्यालयात सापडतात.

संतत्व नाही मठात , नाही कवित्वात , नाही विद्वत्तेत , तेथे स्वानुभव पाहिजे अशी संताची व्याख्या चांगल्या शिक्षकाला लागू पडते. पण बढतीसाठी ही पदवी आवश्यक ठरवली गेली आणि संशोधन क्षेत्राची मंडई झाली. ना अशा संशोधनाची दखल आंतर्राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते ना समाजाच्या वा देशाच्या कामी असे संशोधन कार्य उपयोगी पडते.

२ हिंदु धर्मातील चार आश्रम

हिंदु धर्मांत आयुष्याचे चार आश्रम(टप्पे) सांगितले आहेत , ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि सन्यास . महाभारतात एक चिंतन कथा आढळते .ब्रम्हदेवाने एकाच वेळी चार प्राणी बनवले ते म्हणजे मनुष्य, गाढव, कुत्रा आणि घुबड. सर्व प्राण्यांना सांगितले की तुम्ही पृथ्वीवर जा , तुम्हा सर्वांना अधिकतम आयुष्य असेल ४० वर्षे. गाढव , कुत्रा आणि घुबड म्हणाले आम्हाला येवढे आयुष्य नको, माणुस मात्र म्हणाला चाळीस वर्ष हे काय आयुष्य आहे, कुठलाच उपभोग न घेताच मरायचे? त्यावर ब्रम्हदेव म्हणाला तुम्ही आपसात ही वर्षे वाटून घ्या. गाढव , कुत्रा आणि घुबड यांनी आपापली २० वर्षे माणसाला दिली व माणुस शतायुषी झाला. त्याचा परिणाम असा झाला की माणुस पहिली ४० वर्षे माणससारखा जगतो. पुढची २० वर्षे गाढवाप्रमाणे संसाराची ओझी वाहतो. पुढची २० वर्षे कुत्र्याप्रमाणे घराची राखणदारी करतो. शेवटची २० वर्षे घुबडाप्रमाणे निरर्थक जगतो.

मात्र कांही कर्तबगार व्यक्ती ही ओझे झुगारून देऊन कांही विधायक काम करून अजरामर होतात.एखादा भगतसिह अवघ्या वीशीत हसत हसत फांसावर चढतो. एखादा स्वातंत्रवीर विनयक दामोदर संसार सोडून काळ्या पाण्याची शिक्षा भोगतो आणि म्हणतो ‘ अनादि मी अवध्य मी , मज मारिल असा कोण रिपु जन्मला ’. एखादी मनकर्णिका म्हणते मेरी झासी नही दूंगी आणि रणांगणावर मरण पत्करते. सामान्य माणुस मात्र म्हणतो

<u>लायी हया आए कजा ले चली चले । अपनी खुशीसे न आए न अपनी खुशीसे चले ॥</u>

आजच्या भोगवादी संस्कृतीत ब्रम्हचर्य व गृहस्थ जीवन दोन्ही नको असतील तर ‘ लीव्ह इन रिलेशनशीप’ आली. सर्व सांसारिक कर्तव्ये संपली तरी संसारातून पाय निघत नाही. वानप्रस्थ म्हणजे वनांत (अरण्यांत) जाऊन रहाणे . अरण्य म्हणजे जेथे कोणाशीच शत्रुत्व नाही . ही वृत्ती घरी राहून आत्मसात करता येते.फक्त आपला अहं सोडावा लागतो.

आजकालच्या साधु सन्याशांनी हिंदु धर्माचे जेवढे नुकसान केले आहे तेवढे इतर आक्रमण कर्त्यांनी सुध्दा केले नसेल. प्रत्येक साधु किंवा संत जाती जातीत वाटले गेला . स्वतः कबिरानेच सांगितले आहे ‘ जात न पुछिए साधुकी , देखो उसका ग्यान ‘ . काही ढोंगी राम रहिम नांव धारण करून लाखो लोकांना ठकवतात.

कोरोना काळात मात्र लोक आपापल्या घरातच प्रार्थना करू लागले हे ही नसे थोडके.

३ मानवी पंचेद्रिये- आपले विज्ञान शिक्षक

भाग १- मानवी पंचेंद्रियाबद्दलची मनोरंजक माहिती

इतर सर्व प्राणीमात्रांप्रमाणेच मानवाला पंचेंद्रिये लाभली आहेत..पण मानवाने जी प्रगती केली आहे ती अफाट बुध्दीच्या जोरावर. लाखो वर्षांपूर्वी पक्षी ज्या पध्दतीने घरटी बांधत , त्याच पध्दतीने आजही बांधतात. या उलट आदि मानव गुहेत, झाडांच्या ढोलीमध्ये रहात असे, तो आता वीटा सिमेंटच्या घरात राहु लागला. त्याचे कारण त्याने आपल्या पंचेद्रियांना आपले शिक्षक केले.

मानवी पंचेंद्रिये म्हणजे डोळे , नाक , कान , जीभ आणि त्वचा. ही पंचेंद्रिये सतत आपल्याला कशा रितिने ज्ञान देत असतात ते पाहूं

डोळ्यांनी बघतो ध्वनी परसितो कानी, पदी चालतो ।
जिव्हेने रस चाखतो, मधुर वाचे आम्ही बोलतो ।
हातांनी बहुसाल काम करतो, विश्रांती ही घ्यावया ।
घेतो झोप सुखे, फिरून उठतो ही ईश्वराची दया ॥

<u>१.डोळे (दृष्टी)</u> – मुल जन्माला आले की डोळे उघडतो. आपल्या डोळ्यांनी आसपासच्या वस्तु व प्राणी पाहतो .वेगवेगळे रंग व आकार ओळखु लागतो.

ईश्वराने माणसास जी पंचेंद्रिये दिली आहेत , त्यापैकी नेत्र हे सर्वात महत्वाचे इंद्रिय . कॅमेराला एकच डोळा असतो. पण माणसाला दोन डोळे असल्याने सर्व गोष्टी सापेक्ष दिसतात. वस्तुचे अंतर, लांबी , रुंदी हे समजते. पीन होल कॅमेरा व डोळा ह्यात अनेक गोष्टी समान आहेत. प्रकाश किरणे बुबुळावर पडली की ती आंत जाऊन नेत्रपटलावर (रेटिनावर) पडतात. कॅमेरात ती फोटो फिल्म वर पडतात. नेत्रपटलावर पडलेले किरण मेंदुला संदेश पाठवतात व ते मेंदुत संगहित होतात. अशा अब्जावधी गोष्टी मेंदुत साठवले जातात. आजकालच्या डिजिटल कॅमेरांत अशीच शेकडो चित्रे साठवण्याची सोय असते. कॅमे-यात शटर कमी जास्त उघडण्याची सोय असते, डोळ्याच्या पापण्या प्रकाशाच्या तीव्रतेनुसार कमी जास्त उघडतात. आधुनिक काळात इंफ्रारेड (अतिनील) कॅमेराचा शोध लागल्या ज्यामुळे अंधारात सुध्दा फोटो काढता येतात , व क्रीलिअन

फोटोग्राफी मुळे व्यक्तीच्याभोबती असलेली आभा पहाता येते व त्यावरून् व्यक्तीचे आरोग्य व इतर गोष्टी समजतात. ज्ञानचक्षु सर्वांनाच असतात पण एखादाच सुरदास किंवा गुलाबराव महाराज जन्मतः प्रज्ञाचक्षु असतो आणि त्याच्या सहाय्याने असंख्य काव्यरचना करून अजरामर होतात. दोन व्यक्तीच्या अंगठ्याचे ठसे जुळत नाहीत , तसेच दोने व्यक्तीचे डोळे एक सारखे नसतात.म्हणुनच आधार कार्ड काढताना डोळ्यांचाही फोटो काढला जातो. गुन्हेगार व्यक्तीचा शोध घेण्यासाठी डोळ्यांचा फोटो उपयोगी पडतो.

डोळा हा मानवी मनाचा आरसा असतो. मनात चाललेले भाव , राग, मत्सर, दु:ख वगैरे डोळ्यात समतात. नाट्य शास्त्रात नऊ रस सांगितले आहेत , त्याची अभिव्यक्ती मुख्यतः डोळ्यांनीच होते.त्यामुळे कुठल्याही चित्रातील किंवा मुर्तीतील डोळे रंगवणे अति कौशल्याचे काम असते.

चित्रात भाव कसे दाखवावे याबद्दल डोळ्याबद्दलची संस्कृत ग्रंथातील माहिती माहिती अशी आहे.

चापाकारं भवेन्नेत्रं योगभूमि निरीक्षणाद् ।
मत्स्योदरा कृतिकार्यं नारीणां कामीनां तथा॥
नेत्रमुत्पलपत्राभं विर्विकारस्य शस्तते ।
त्रस्तस्य रुदतश्चैवपद्मपत्रनिभं भवेद्॥
क्रुध्दस्य वेदनार्तस्य नेत्र सशुसम भवेद्।

समाधीतील किंवा जमिनीकडे पाहणारे डोळे , धनुष्याच्या आकाराचे असावे. कामी लोक यांचे डोळे माशाच्या पोटासारखे असावे, त्रासलेला रडणारा यांचे डोळे पद्मकमलाच्या पाकळीसारखे असावे व रागावलेला, वेदनानी व्याकुळ झालेल्याचे डोळे सशाच्या डोळ्यासारखे असावे. हरिणाच्या डोळ्यासारखे डोळे म्हणजे मोठे सुंदरतेचे लक्षण ही गोष्ट सर्व प्रसिध्दच आहे. डोळे मोठे असावे निदान बारिक नसावे .



मानवाला दोन ऐवजी एकच डोळा असता तर काय अडचण झाली असती हे समजण्यासाठी समजण्यासाठी भाग दोन मध्ये दिलेला करून पहा .

२. कान : दुसरे पंचेंद्रिय म्हणजे कान. हजारो वर्षांपूर्वीचे वैदिक ज्ञान "श्रुती स्मृती पुराण" या पध्दतीने टिकून राहिले असे हे कानाचे महात्म्य. कानाने न ऐकू येणारे मुल बहिरे बनते. या उलट आंधळी मुले कान व स्पर्श याच्या सहाय्याने आपला मार्ग शोधतात. अनेक आंधळ्या व्यक्ती विविध कलांत प्राविण्य मिळवतात. काही चांगले गायक व संगितकार होतात. तसे कर्ण बधिर व्यक्तींचे होत नाही.

कानाचे छिद्रातून ध्वनी तरंग कर्ण पटलावर पडून मेंदूला संकेत पाठवतात. मेंदू या संकेतांचा शब्द व चित्रांशी संबध लावतो. अनोळखी भाषा आपण ऐकतो पण समजत नाही कारण त्या शब्दांचा अर्थ मेदूने अगोदर लावलेला नसतो. कुत्रा या सारख्या काही जनावरांची श्रवणशक्ती अदभुत असते. शेकडो मिटर दूरून येणारे आपल्या मालकाचे वाहन कुत्रा ओळखतो व शेपुट हलवू लागतो. गोकर्ण या वेलीचे फुल हुबेहुब गाईच्या कानासारखे दिसते.

कर्णवेध किंवा कान टोचणे हा हिंदुंच्या सोळा संस्कारापैकी नववा संस्कार. हा संस्कार वयाच्या पहिल्या पांच वर्षात करायचा असतो पण महराष्ट्रात बाळाच्या जन्मानंतर बारावे दिवशी , त्याचे दोन्ही कान टोचतात. ही छिद्रे बुजु नये म्हणून त्यात दोरा किंवा सोन्याची बारिक तार घालतात. कर्णवेधाने विध्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढते असा एक समज आहे . कर्णवेधामुळे पुरुषांना मुत्रपिंडाचे विकार (हार्निया/ हायड्रोसील) होत नाहीत व स्त्रीयाना मासिकपाळीचा त्रास कमी होतो किंवा उन्माद (हिस्टेरिया) होत नाही असे आयुर्वेदात सांगितले आहे.

पुढे या छिद्रांचा उपयोग स्त्रीया कानांतील अलंकार घालण्यासाठी करतात. ही दोन छिद्रे कमी पडतात म्हणून की काय नाक व कानाची वरची बाजु येथेही छिद्रे करून घेतात.

आधुनिक शरिरशास्त्राप्रमाणे (ह्युमन ॲचनोटोमी) कानाचे तीन मुख्य भाग सांगितले आहेत ते म्हणजे बाह्य, मध्य अंतर्भाग. पण सामान्य जनांच्या दृष्टीने बाह्य भाग म्हणतेच कान. या बाह्य किंवा दृष्य कानाचे तीन भाग करता येतील.

१.सर्वात वरचा भाग जेथे पुरुष भिकवाळी किंवा स्त्रीया बुगडी घालतात तो.

२.मधला भाग ज्याच्यात कानाचे नैसर्गिक छिद्र असते तो भाग.

३. सर्वात खालचा भाग जेथे स्त्रीया डुल, कर्णफुले घालतात तो.

निसर्गत: कोणत्याही दोन व्यक्तीचे कान सारखे नसतात हे सुक्ष्म निरिक्षण केले तर लक्षात येईल.

संपूर्ण बाह्य कान: हा बहुतांशी गालाना समांतर असतो पण काहींचे कान ६० ते ९० अंशात असतात जसे गणपतीच्या मुर्तीचे कान असतात तसे. आंतरजातिय विवाहित स्त्रीयांच्या मुलाचे कान असे असतात असा समज आहे.

कानाचा सर्वात खालचा भाग: हा बहुतांशी गालापासून वेगळा किंवा सुटा असतो . पण काही जणांत हा भाग गालाशी चिटकून असतो. जसा भगवान बुध्दाचा कान. ज्ञानी माणसाचा कान असा असतो असा समज आहे.

कानाचा सर्वात वरचा भाग: प्रौढ पुरषांच्या कानावर येथेच केस उगवतात. प्रसिध्द किंवा धुर्त पुरूषाचे हे ठळक लक्षण म्हणता येईल.

कानाचा मधला भाग: हाच भाग कुठल्याही दोन व्यक्तीत सारखा नसतो. संपूर्ण कानाला ह्यामुळेच मजबुती येते. या तीन भागांचे सुक्ष्म अवलोकन केले तर व्यक्तीचा स्वभाव याची कल्पना करता येऊ शकेल.

<u>३.नाक (घ्राणेंद्रिय)</u> : याचे मुख्य काम म्हणजे श्वास घेणे व सोडणे. कवियत्री बहिणाबाईने लिहिले आहे की' जीवन मरण एका श्वासाचे अंतर. कांही ज्ञानी पुरुषांचे म्हणणे आहे की ' मनुष्य जन्मते वेळीच तो किती श्वास घेणार हे ठरलेले असते. ' योगाचार्यांचे म्हणणे आहे की मंद श्वास घेणारा प्राणी दीर्घ काल जगतो. उदाहरणार्थ कासव ५०० पेक्षा अधिक वर्ष जगतो तर ससा केवळ एक दोन वर्षेच जगतो.

नाकाचे दोन भाग म्हणजे दोन नाकपुडया .ह्या दोन्ही घशातील एका छिद्रास जोडलेली असतात . श्वास घेणे हे जरी नाकाचे मुख्य कामा असले तरी गंध ओळखणे हे ही काम त्याचेच आहे पण अनोळखी गंध तो पर्यंत ओळखु . मनुष्य हजारो प्रकारचे परिचित गंध ओळखु शकतो.

उदाहरणार्थ ज्याने सोनचाफ्याचा वास अगोदर घेतला नाही त्याला हा वास सोनचाफ्याचा आहे हे सांगावे लागते. फळ पिकले आहे की नाही हे वासावरून समजते इतकेच काय स्वयंपाक घरांत काय शिजते आहे हे वासावरून दूरुनही समजते.

अत्तराचे मुख्य काम म्हणजे सुगंध पसरवणे तराचे मुख्य प्रकार म्हणजे., फुलांपासून बनवलेली मोगरा), गुलाब ,केवडा इत्यादि (, कांही पशुजन्य व्हेल . कस्तुरी मृगाच्या नाभी पासून-कस्तुरी) (माशाच्या ओकारीपासून, काही झाडांच्या खोडापासून चंदन),निलगिरी इत्यादि. बृहत सन्हितेत केवळ सोळा मुलद्रव्ये वापरून एक हजार आठ प्रकारचीअत्तरे कशी बनवावी हे दिले आहे.

माणसापेक्षा काही जनावरांचे घ्राणेंद्रिय अधिक तीक्ष्ण असते म्हणूनच पोलिसी (कुत्रा) याच प्रमाणे कांही किटक मु . तपासात गुन्हेगाराचा माग कुत्रा सहज घेतो मुंगी झुरळे इत्यादि आपल्या खाद्याचा शोध न बघता सुध्दा घेतात.

चेहत्यामुळेच . ठळक उठून दिसणारा अवयव म्हणजे नाक .ील.यात- चेह . याला शोभा येते- चपटया बसक्या नाकाचे पुरुष कलाकार जरी चित्रसृष्टीत टिकले तरी नकटया नाकाची हिरॉइन .नकटीच्या लग्नाला विघ्ने फ़ार अशी म्हण आहे .चालत नाही

नाकाचे असंख्य प्रकार असतात नाकाचा सामान्यपणे पुरुषाचे नाक स्त्रीच्या नाकापेक्षा मोठे असते . आकार वरुंदी स्थानिक भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असते असे संशोधनाद्वारे सिध्द झाले आहे नाकपुडी टोचून त्यात असंख्य प्रकारचे अलंकार घालणे हा भारतीय स्त्रीयांचा आवडता . याचे लक्ष वेधणे याशिवाय या अलंकारांचा काय उपयोग असावा हा संशोधनाचा-दुस .विषय आहे .विषय ठरू शकेल

<u>४.जीव्हा (रसना-जीभ):</u> जीभेचा मुख्य उपयोग म्हणजे कुठल्याही पदार्थाची चव घेणे. आपल्या शास्त्रांत सहा चवी (षडरस) सांगितले आहेत , ते म्हणजे गोड , कडू , तिखट, आंबट, खारट व तुरट (मधूर, कटु, तिक्त, आम्ल, लवण व तुर्य).जीभेचा जो वरचा भाग असतो त्यावर वेगवेगळ्या ठिकाणी रसबिंदु (टेस्ट बडस) असतात .

प्रत्येक चवीचे बिंदु वेगळे असतात , कांही कारणामुळे जर जीभ (उष्ण पेयामुळे , न विरलेल्या चून्यामुळे वा आजारपणामुळे) हे रसबिंदु काही काळापुरते काम करेनासे होतात , मग

सर्वच पदार्थ बेचव वाटु लागतात. कांहीवेळा नुसत्या कल्पनेने सुध्दा हे बिंदु उद्दिपित होतात , उदाहरणार्थ, चिंच कैरी सारखे आंबट पदार्थ.

मनुष्यासाठी जीभेचा दुसरा उपयोग म्हणजे स्पष्ट शब्दोच्चारासाठी. तालव्य व्यंजन (ट,ठ ड ढ ण) आणि दंतव्य व्यंजन (त थ द ध न) यांच्या स्पष्ट उच्चारासाठी जीभेचा टाळुशी किंवा वरच्या दातांच्या आतल्या भागास जीभेचा स्पर्श होणे आवश्यक असते. दंतविहिन वृध्द किंवा शिशु यांचे उच्चार म्हणूनच स्पष्ट नसतात. चांगल्या गायकासाठी किंवा व्यक्त्यासाठी उच्चार स्पष्ट असणे अतिशय आवश्यक आहे.

शाकाहारी प्राणी (गाय, म्हैस, बकरी इ.) तोंडानी पाणी पितात तर मांसाहारी प्राणी (कुत्रा , मांजर, वाघ इ,) जीभेच्या सहाय्याने पाणी पितात.काही प्राणी (साप, पाल,बेडुक , सरडा इ,) आपले भक्ष पकडण्यासाठी आपल्या लांब जीभेचा उपयोग करतात.

५. त्वचा (स्पर्शेंद्रिय) : माणसाप्रमाणेच पशु ,पक्षी, झाडे यांना सुध्दा स्पर्श ज्ञान असते.नवजात शिशुसुध्दा कांही तासातच आपल्या आईचा स्पर्श ओळखु लागतो. माणसाची त्वचा अतिशय संवेदनशील असते. लहानसा डांस /माशी जरी अंगावर बसली तरी जाणिव होते. अगदी लहानसा कांटा जरी रुतला तरी वेदना होतात , तो काढून टाकेपर्यंत. स्पर्शामुळे वस्तुची व्याप्ती व आकार समजतो. आंधळी व्यक्ती ब्रेल लिपीमुळे पुस्तक वाचु शकतो , कांठीच्या सहाय्याने रस्ता ओलांडु शकतो, चांगला वादक हऊ शकतो ही स्पर्शची शक्ती आहे. शस्त्रक्रीया करतांना वेदना होऊ नये म्हणून शरिराचा आवश्यक तेवढा भाग बधीर करतात. मानवी त्वचेचा रंग भौगोलिक परिस्थितीव हवामान यावर अवलंबून असतो. त्यामुळे काश्मिरी लोक गोरे तर दक्षिण भारतिय काळे असतात. पण पिढ्यांपिढया दक्षिणेत राहूनही कांही लोक गोरेपणा टिकवूनआहेत. यामागे जेनुकिय घटक (जीनोलोजी फॅक्टर) कारणीभूत असू शकतील.

माणसापेक्षा जनवरांची त्वचा जाड असल्याने त्याना स्पर्शज्ञान कमी असते. वृध्दकालात माणसाची त्वचा पातळ होत जाते त्यामळे त्यांना इजा लवकर होते.

मानवी पंचेंद्रियाबद्दलची मनोरंजक माहिती या भागात दिली आहे. पंचेंद्रियांच्या कार्य पध्दतीमागचे विज्ञान पुढिल भागांत दिली आहे.

४ भारतीय ज्योतिष व त्याची उपयुक्तता

एक निर्धन माणुस ज्योतिष्याकडे गेला व त्याला आपले भविष्य विचारले. जोतिष्याने काही आकडेमोड करून सागितले की ' यजमान आपली पुढची दहा वर्षे कष्टमय जातील. निर्धनाने विचारले पुढे काय ? ज्योतिषी शांतपणे म्हणाला पुढे तुम्हाला त्याची सवय होईल.

अनेक असमाधानी व्यक्ती ज्योतिषी, मांत्रिक बुआ किंवा महाराज याचे नादी लागतात, ते सांगतिल ते उपासतपास करतात, हातात वेगवेगळ्या खडयाच्या अंगठया घालतात. पण अगदी बादशाही उपभोग भोगून झाल्यावर सुध्दा एखादा जफर म्हणतो

उमर ए दराज से मांगे थे चार दिन, दो आरजू मे कट गये दो इंतजार मे

७ व्या शतकात भास्कराचार्य नावाचा महान गणितज्ञ होऊन गेला जो श्रेष्ठ ज्योतिषी सुध्दा होता . आपल्या मुलीच्या आयुष्यात वैधव्य योग आहे हे त्याने जाणले होते. मुलगी उपवर झाल्यावर त्याने असा एक लग्न मुहुर्त शोधला की त्या मुहुर्तावर लग्न झाल्यास वैधव्य योग टाळता येईल . घटिका पात्र पाण्यात ठेवले गेले . त्या पात्राकडे पाहणा-या कन्येच्या शिरो अलंकारातील एक मणी घटिका पात्रात पडला, मुहुर्त टळला आणि ती कन्या लवकरच विधवा झाली.

दैव जाणले कुणी अशी म्हण आहे पण होणार ते अटळ आहे हे समजून ते जाणून घ्यायचा प्रयन शहाण्याने करू नये. दिवसाची सुरवातच दैनिकातील राशी भविष्य पाहून होते.

शुभ मुहुर्ताची वाट न पाहता थोरले बाजीराव सर्व लढाया जिकले, केवळ रणांगण आपल्याला अनुकुल आहे की नाही हे पाहिले.

राहु काल हा दाक्षिण्यात्य लोकाचा आवडता विषय . हा काल अशुभ समजला जातो . शहरा शहरा प्रमाणे तो बदलतो सुध्दा . नशिब आपले की भारतीय रेल किंवा विमान खाते यावर विश्वास ठेवत नाही. सरकारी कार्यालये या राहु काळात बंद केली जात नाहीत.

भारताचे एक भूतपुर्व निर्वाचन अधिकारी स्वतः उत्तम ज्योतिष्य पारंगत होते .आपल्या पत्रिकेत अपत्य योग नाही हे जाणून तसेच योग असलेल्या एका स्त्रीशी त्यानी लग्न केले. दूरचित्रवाहिन्यावर रोज सकाळी सर्व प्रकारची भविष्ये सागितली जातात.काही मासिकाचे दिवाळी अंक केवळ भविष्य वाचण्या साठीच

विकत घेतले जातात. जगातील कुठल्याच ज्योतिष्याला भुकम्प, चक्री वादळ,अतिवृष्टी यांची पूर्वसूचना देता येत नाही मात्र घटना घडून गेल्यावर तासंतास ग्रहयोग कसे होते याच्या चर्चा चालतात.

जाता जाता...

महाभारतातील यक्षप्रश्न प्रसिध्द आहेत. यक्ष्याच्या ' किम आश्चर्यम ' याचे युधिष्ठिर समर्पक उत्तर देतो . कबिर सुध्दा हेच चिरंतन सत्य सांगून गेला ' मै यही समझाउ सब जग अंधा ,एक दिन तो जाना है भाई दुसरेके खंदा . गालिब असेच काही सांगून गेला आहे. ' हमको मालुम है जन्नत की हकीकत लेकीन दिल के बहलाने गालिब ये खयाल अच्छा है.

५ सैया निकस गये – मै ना लढी थी

सैया निकस गये मै ना लढी थी

कबीराचे हे भजन प्रथमदर्शी एका स्त्रीने म्हटलेले विरह गीत वाटते. पण या गीतात एक चिरंतन सत्य दडलेले आहे.

- सैया निकस गये मै ना लढी थी - सैया (प्राण) स्त्रीला (शरीराला) सोडून निघून गेला आहे. मनुष्यप्राणी आपल्या शरीरावर प्रेम करतो , अजाणतेपणेसुध्दा आपल्याच शरीराला दु:ख पोहचवत नाही.
- रंगमहल के दस दरवाजे ,ना जाने कौन सी खिडकी खुली थी - रंग महालाला (शरिराला) दहा दरवाजे (शरीराची नऊ छिद्रे व मेंदु) आहेत , कोणत्या दारातून सैया (प्राण) निघून जातो ते कुणालाच समजत नाही. (बहुतांशी माणसाचा मृत्यु झोपेत होतो. मृत्युच्यावेळी वेगाने मल किंवा मुत्र शरीराबाहेर पडते तर कांहीचे डोळे किंवा तोंड उघडे राहते.)
- मेरी न मानो सहेली से पूछो -विरही स्त्री म्हणते माझ्या सात सख्याना सुध्दा (शरिराची पंचेंद्रिये , मन व बुध्दी) कोणालाच न सांगता माझा सखा (प्राण) निघून गेला.
- कर सिंगार मैं दुल्हन बनी थी , ऐसी दुल्हन से कुँवारी भली थी - विरही स्त्री पुढे म्हणते वधु झाले तेव्हा पूर्ण शृन्गार केला होता पण आता तर सखाचा निघून गेला ह्यापेक्षा मी कुमारीकाच राहिले असते (हा जन्म घेतला नसता तर जन्म मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळालीतरी असती.)

- कहत कमाली , कबीरकी वेटी बहुदा कबीराचे हे अपूर्ण भजन त्याची (मानलेली) मुलगी कमाली हीने पूर्ण केले असावे. हे भजन अनेक गायक/ गायिकानी अनेक रागात गायलेले आहे. उदहरणार्थ ,कौशिकी चटर्जी – भैरवी, शोभा गुर्टु –ठुमरी, लता मंगेशकर- चित्रपट्गीत वगैरे

ना कछु बोली ना कछु चाली, सरको झुकाए मै तो चुपके खडी थी, मेहंदी मे मेरे असुवन की लडी थी ,

रंग महलके दस दरवाजे, ना जाने कौनसी खिडकी खुली थी।

कर सिंगार मै दुलहन बनी थी ,ऐसे दुलहन से कुंवारी भली थी ।

कहत कमाली , कबीरकी वेटी, ऐसी बियाही से तो कुँआरी भली थी
सैय्या निकस गये मैं ना लड़ी थी

६ मला उमगलेला कबिर



लहानपणापसून मी अनेक संत चरित्रे वाचत आलो आहे. त्या संताची नांवे सांगून त्यांच्या भक्तांच्या श्रध्देचा अपमान मी करणार नाही. ही सर्व चरित्रे म्हणजे या संतांनी केलेल्या चमत्कारांची अवास्तव वर्णने. कोणी केवळ पाण्याने शेकडो पणत्या पेटवल्या , कोणी इंधन नसलेली गाडी चालवली तर कोणी बारा वर्ष कोरडी असलेल्या विहिरित काठोकाठ पाणी उत्पन्न केले. जे संत घरोघरी भिक्षांदेही करत त्यांच्यासाठी त्यांच्या भक्तांनी त्यांच्या पश्चात मठ मंदिरे उभारली, सोन्याचे आसन व मुकट बनवले. अशा कोणत्याही संताने ज्ञानेश्वर तुकाराम यांच्यासारखी काव्यरचना केलेली आठळली नाही किंवा समाज प्रबोधन केलेले आढळत नाही.

हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे मी नुकताच पाहिलेला वृत्तचित्रपट " हद –अनहद". एका आगळ्या वेगळ्या फकिराची ओळख त्या निमित्ताने झाली . मुस्लीम संप्रदायात संतत्वाच्या तीन अवस्था सांगितल्या आहेत. औलिया , पीर व सर्वात उच्च असा फकिर . साडेचारशे वर्षांपूर्वी असाच एक फकिर काशीला होऊन गेला त्याचे नांव होते कबिर. नदीचे मुळ व ऋषीचे कुळ पाहू नये असे म्हणतात. एका नवजात शिशुला त्याची ब्राम्हण आई एका तलावाकाठी (लहरतारा) ठेऊन निघून गेली. निरू नावाच्या मुस्लीम विणकराने त्याचे पालन पोषण केले. त्याचे नांव ठेवले "कबिर –म्हणजे महान ".

हा मुलगा मोठा झाल्यावर बडिलाने विणलेले कापड गांवोगांवच्या बाजारांत विकणे हा त्याचा व्यवसाय ठरला. या भटकंतीत त्याला समाजातील अनिष्ट प्रथा , मग त्या मुस्लीम समाजाच्या

असोत किंवा हिंदु समाजाच्या असोत , दृष्टीस पडल्या . त्यावर त्याने दोन ओळींच्या दोह्यांनी समाज प्रबोधन केले.

स्पृश्य समाजातील कांही लोक एका अस्पृश्य मुलाला काठ्यांनी मारतांना पाहून ते वार त्याने स्वत; झेलले आणि बोलता झाला " कुआ कबिरा एक है , पानी भरे अनेक I भाडोंमे ही भेद है , पानी सबमे एक ॥. असे असंख्य दोहे त्याने हिंडता फिरता रचले. संकटात सर्वांना देव आठवतो ह्या वर त्याचा एक दोहा अनेक तिर्थक्षेत्री कोरलेला किंवा रंगविलेला आढळतो. "दुखमे समिरन करे सभी सुखमे करे न कोई I जो सुखमे समिरन करे उसे दुख काहे का होय ॥ समाजातील दुर्बल घटकांकडे लक्ष ने देता चैन करणा-या उच्च वर्गाला त्याने सुनावले " बडा हुआ तो क्या हुआ जैसा पेड खजूर I पंछीको छाया नही फल लागे अति दूर ॥. जातीभेद पाहून त्याने भविष्यवाणी केली " माटी कहे कुम्हार से तु क्या मुझ को रोंदेगा I एक दिन ऐसा आएगा मै तुझको रोंदुंगी और तु रोयेगा ॥ कबिर न कधी मशिदीत गेला न कोणत्या मंदिरात. पण मशिदी बाहेर भीक मागणा-यांना सांगितले " त्या डोक्यावर मटक्यात पाणी भरून आणणा-या स्त्रीयांकडून जरा शिका ,त्या चालताना , गप्पा मारतांना दिसत असल्या तरी त्यांचे सारे लक्ष डोक्यावर भरलेल्या मटक्याकडे आहे."

कबिराला समाजातील सर्व वाईट गोष्टी नाहीशा करवयाच्या होत्या. म्हणून समविचाराच्या लोकांना त्याने आवाहन केले " कबिरा खडा बाझार मे लिए लकुटी (मशाल) हाथ , जो घर अपना फुकने निकले, चलो हमारे साथ " हे सर्व सांगत असतांना लोकांनी आपला धर्म किंवा जात बदलावी असे सांगितले नाही , न कुठल्याही समाजाविरुध्द अपशब्द उच्चारला. " बुरा खोजन मै चला, बुरा न मिलिया कोय जो दिल खोजा अपना मुजसा बुरा न कोय. पढतमुर्ख पंडितांना त्याने सुनावले " पोथी पढ पढि पंडित भया न कोय , ढाई अक्षर प्रेमका पढे सो पंडित होय " सर्वधर्मसमभाव म्हणजे काय ते त्याने जगाला शिकवले. " कर गुजरान फकिरीमे , मगरूरी क्यो करता ? हे जसे पंडितांना विचारले तसेच " मुल्ला होके बांग लगाए , क्या तेरा साहेव बहरा है असे मुल्लानांही विचारले. जो पर्यंत मनातील अहंकार जाणार नाही तो वर इश्वरप्राप्ती होणार नाही हे त्याने " जब मै था तब हरि नाही, जब हरि है तब मै नही" इतक्या सोप्या शब्दात सांगितले. चागंला साधु कोण याचे कबिर उत्तर देतो की " साधु ऐसा चाहिए जैसा सुप सुभाय , सार सार

गहि रहे थोथा देत उडाय " निंदकाचे घर असावे शेजारी असे तुकरामाचे शंभरवर्षे अगोदर कबिर सांगतो की "निंदक नियरे राखिये आंगन कुटी धवाय बिन पानी ,साबून निर्मल करे सुभाय " कबिराची जात कोणती हे विचारणा-या तो सांगतो "जाति न पुछो साधुकी ,पुछ लिजिए ज्ञान मोल करो तलवार का पडा रहन दो म्यान ". माणसाची इच्छाशक्ती प्रबल असली की काहीही साध्य करता येते हे सांगताना म्हणतो " मन के हारे हार है,मन के जीते जीत है.

असा हा संत काशी नगरीतील धर्माचे अवडंबर, मुल्ला मौलवीचा त्रास याने कंटाळून जाऊन त्याने काशी सोडून ' मघर' (लखनौ – गोरखपूर मार्गावरील एक लहान गांव) या गांवात राहु लागला. आपल्या पश्चात हिंदु –मुसलामान यांच्यात भांडणे होउ नये म्हणून आपल्याच चादरीखाली फुले रचली व नाहिसा झाला. ह्याच फुलांची वाटणी करून हिंदुंनी स्मारक बनवले तर मुस्लिमांनी अगदी लगूनच मशिद बांधली. दर वर्षी चैत्र महिन्यात कबिराचा उत्सव साजरा होतो.



आपल्या हयातीत कबिराने कोणताच पंथ निर्माण केला नाही. मानवधर्म हाच खरा धर्म हे समाजाला शिकवले.

एका हातांत एकतारी व दुस-या हातात चिपळ्या ही कबिरपंथीयांची ओळख . हिंदुस्तान व पाकिस्तान या दोन्ही देशांत असंख्य गायक व कव्वलांनी त्याचे दोहे अजरामर केले आहेत. " चदरिया झिनी रे झिनी " गाऊन अनुप जलोटा भजन सम्राट झाले. कविराची निर्गुण भजने गाऊन कुमार गंधर्व यांनी लोकांना मत्रमुग्ध केले. कविवर्य माडगुळकरांना ' कविराचे विणतो शेले, कौशल्येचा राम हे गीत स्फुरले . भारत सरकारने कबिर स्मरणार्थ डाक तिकिट काढले , उत्तर प्रदेश सरकार ने कविराचे जन्मगावी एक भव्य स्मारक उभारले आहे.



भिष्म सहानी यांनी कबिरा खडा बाजारा मे या नावांचे नाटक लिहिले. राजस्तान मध्ये कबिराचे नांवाने मेळा भरतो.

प्रस्तापित रुढी परंपरा या विरुध्द साडे चारशे आवाज उठवणारा कबिर जर आज जिवंत असता तर ?

- तथकथित सेक्युलरवादी व मानवाधिकार संघटनांनी त्यावर खटले चालवले असते.
- कबिराच्या वक्तव्याने समाजात चुकीचे संदेश जातात ह्या आरोपाखाली एखाद्या राज्यात त्याला अटक झाली असती.
- पून्हा एकदा त्यावर पोलिसांच्या उपस्थितीत लाठी हल्ला होऊन तो मारला गेला असता.
- मग कबिर म्हणता झाला असता ," भला हुआ मेरी माला तुटी मै नाम भजनसे छुटी , भला हुआ मेरी मटकी फुटी मै पनिया भरन से छुटी.

७ कोरोना- एक इष्टापत्ती

भला हुआ मेरी माला तुटी, मै नाम भजन से छुटी। भला हुआ मेरी मटकी फुटी मै पनियां भरन से छुटी ॥ कबिर

जपान मधिल बौध्द भिक्षुची एक कथा आहे. पायांत लाकडी खडावा व अंगावर भगवी वस्त्रे धारण केलेला भिक्षु शहरातील मोठमोठ्या दुकानांत जाऊन काय गोष्टी विकावयाला ठेवल्या आहेत त्यांची पहाणी करायचा. वस्तु कोणतीही असो , सर्वात आधुनिक टेलिव्हिजन, फ्रीज, मोबाइल किंवा सर्वात महाग पादत्राणे असो , त्या वस्तुची सविस्तर माहिती व उपयोग याची दुकानदाराकडून माहित करून घेत असे पण कधीच कोणतीही वस्तु विकत घेत नसे. शेवटी एका दुकानदाराने नम्रपणे त्या भिक्षुला विचारले " महाराज आपण रोज निरनिराळ्या वस्तु बघता , त्यांची चवकशीही करता पण अजून एकही वस्तु विकत घेतली नाही असे कां ? त्यावर त्या भिक्षुने शांतपणे सांगितले " ज्या वस्तुंवाचून माझे कांही अडत नाही अशा निरुपयोगी वस्तुंची मी नोंद ठेवतो. हाताच्या ओंजळीने पाणी पिता येते असे समजले तेंव्हा मी माझ्या कमंडलुचाही त्याग केला."

ही गोष्ट आज आठवली त्याचे कारण सध्याचा लॉकडाउन. कांही दिवसापूर्वी पती पत्नीला विचारित असे ' ब्रेकफास्टला उशीर असेल तर मी बाहेरच नास्ता करतो , त्यावर त्याची पत्नी म्हणत असे , थांबा मी पण येते आपण इडली , डोसा उत्तपा खाउ येतांना मुलांसाठी पिझ्झा ,बर्गर आणि न्युडल घेऊन येऊन येऊ '. पूर्वी ५०० पावलावर असलेल्या पानाच्या दुकानांत जाण्यासाठी लोक पटकन स्कुटर नाहीतर कार काढत असत. पावला पावलावर समोसा , कचोरी, तर्री-पोहे, वडा-पाव , भजी मिसळ यांचे ठेले असत.

पण आतां हे चित्र बदलले आहे. पती बाहेर जातो म्हणाला तर पत्नी म्हणते थांबा मी आज सर्वांसाठी थालिपिठे बनवते. पूर्वी चमच्यापासून ते पाण्याचे पिंप मोलकरिणीला घासायला टाकणारी गृहिणी आतां सर्व भांडी लगेच घासून विसळून ठेऊ लागली, हातरुमालापासून ते चादरी पडदे धुवायला टाकणारी गृहिणी तेच कपडे स्वतः धुतले तर जास्त स्वच्छ धुतले जातात हे शिकली.

दिवसाचे १८ तास , टीव्हीवर रटाळ मालिका , चर्चा , राजकिय घडामोडी पाहणारी मंडळी आतां लॉकडाऊनच्या मुळे कोणतीही जाहिरात नसलेल्या रामायण , महाभारत सारख्या मालिका लोक आवडीने पाहु लागले. एखादी मालिका जरा लोकप्रिय होऊ लागली की जास्तीत जास्त जाहिराती दाखवून रटाळ मालिकेचे २००० एपिसोड दाखवणारे निर्माते या जून्या मालिकांचे टी आर पी पाहून   आश्चर्यचकीत झाले आहेत.

लॉकडाऊनच्या मुळे लोक धर्मावर आधारित राजकारण, निवडणुका, त्यांचे एक्झिट पोल विसरले, वर्षभर चालणारे वन डे , ट्वेंटी – ट्वेंटी क्रिकेट विसरले. तेंडुलकर गावस्करच्या शतकांचा इतिहास तोंडपाठ असणारे पालक आपल्या मुलांच्या भुगोल इतिहासाची पुस्तके गंभिरपणे वाचू लागले.

आपला जीव धोक्यात टाकून काम करणारे सफाई कर्माचारी पाहिले की रस्त्यात कचरा फेकणा-यांना जनाची तसेच मनाची लाज वाटु लागली. जरा दोन चार शिंका आल्या की डॉक्टरकडे धावणारी मंडळी आता घरगुती उपचार करायला शिकली. कोचिंग क्लासपेक्षा घरीच चांगला अभ्यास होतो हे मुले शिकली.

‘वयंम पंचधिकं शंतम् - सांगणारा महाभारतातील युधिष्टिर आठवून पहा. राष्ट्रावर संकट आले तर आम्ही धर्म , जात पात पक्ष सर्व विसरून संकटचा सामना करण्यासाठी एक झालो हे ही नसे थोडके !

वातावरणातील सर्व प्रकारचे प्रदुषण कमी होत आहे हे अगदी सामान्य माणसालासुध्दा समजले.जालंदर पासून शेकडो किलोमिटर दूर असलेली हिमालयाची शिखरे दिसू लागतात, रात्रीचा निरव शांततेत घड्याळाची टिकटिक स्पष्ट ऐकु येते. दूरवर कुठे पावसाचे शिंतोडे पडले की मातीचा सुगंध सुखावून जातो.

सध्याचा लॉकडाउन कांही दिवसांनी मागे घेतला जाईल पण पुढे काय ? आज भारतीय लोकांना संयम व शिस्त याची सवय झाली आहे त्याचे काय होईल ? की पून्हा दुस-या कोरानाचा भस्मासूर येणारा नाही या समजुतीवर विश्वास ठेवून येरे माझ्या मागल्या असे सुरू होईल? त्यावर कबिराने सांगितले आहे ‘मन लागो यार फकिरेमे’. श्रुणं कृत्वा धृतं पित्वा किंवा भौत्तिक चंगळ प्रवृती सोडून प्रखर राष्ट्रवाद , शिस्त व संयम या मार्गाने चाललो तर असे अनेक कोरोना आम्ही पराभूत करू शकू .

८ महाभारतांतील गोष्टी – कालच्या आणि आजच्या

लेख पहिला- कर्णाच्या रथाचा सारथी शल्य

कौरव आणि पांडव यांच्यात युध्द अटळ आहे हे लक्षात आल्यावर दोन्ही पक्षांनी आपापल्या सैन्याची जमवाजमव सुरू केली. श्रीकृष्णाने मी हातात शस्त्र धरणार नाही असे अगोदरच जाहीर केले. अशा वेळी श्रीकृष्णाला भेटण्यास अर्जून व दुर्योधन एकाच वेळी त्याच्या महालांत पोहचले. तेव्हा श्रीकृष्ण निजलेले होते. अर्जून सवयीप्रमाणे पायाशी बसला तर दुर्योधन उशाशी उभा राहिला. जाग आल्यावर कृष्णाची नजर अर्जूनाकडे गेली व त्याला भेटीचे कारण विचारले. त्यावर माझ्या रथाचे सारथ्य तू करावेस अशी विनंती केली . दुर्योधनाने मात्र कृष्णाचे सर्व सेन्य मागितले. कृष्णाने दोघांनाही होकार दिला.

श्रीकृष्ण स्वत: अर्जूनाच्या रथाचे सारथ्य करणार हे जेव्हा कर्णाला कळले तेव्हा आपल्यालाही असाच तुल्यबल सारथी हवा असा आग्रह दुर्योधनाजवळ केला. असा तुल्यबल सारथी केवळ मद्र देशाचा राजा शल्य असा एकमात्र होता. दुर्योधनाने शल्य राजाची विनवणी केली पण कर्ण हा सूतपुत्र आहे त्याचे सारथ्य माझ्या सारख्या राजाकडून होणार नाही असे सांगितले. वारंवार विनवणी केल्यावर एका अटीवर शल्य सारथ्य करण्यास तयार झाला. ती अट होती की मी कर्णाचा सदोदित पाणाउतारा करेन. कर्ण त्याला तयार झाला . कुरूक्षेत्रावरील युध्दात शल्य सारखा पाणाउतारा करित असे . अर्जूनासमोर तुझा निभाव लागणार नाही असे वारंवार सांगत असे. शेवटी कर्णाचा रथ जमीनीत रुतला तेव्हा कर्णाला मदत न करता शल्य निघून गेला. नि:शस्त्र असा कर्ण रथाचे चाक काढत असताना अर्जूनाने त्याचा वध केला.

महाभारतकाळी एकच शल्य होता. पण आज पदोपदी शल्य आढळतात. कितीही चांगले काम केले तरी त्यात चूका काढणारे वरिष्ठ आढळतात. केवळ शिकवणी वर्ग लावला नाही म्हणून पदोपदी अपमान करणारे शिक्षक असतात. सासूच्या रुपात घरोघरी शल्य असतात. सासूने इतका छळ करूनही तू सासर का सोडत नाही असे मैत्रीण जेव्हा विचारते तेव्हा हीच सून म्हणते ‘ माझ्या मुलीच्या माहेरासाठी मी हा त्रास सोसते ’ बहिणाबाईला हे सुचले. आजचे कर्ण असाच अपमान गिळून आपले काम करित असतात.

एखद्याच भाग्यवंताला श्रीकृष्णासारखा सारथी मिळतो. एखादा दिनानाथ कन्येसाठी स्वरांचा कल्पवृक्ष लावुन जातो. कुणाला तो पत्नीच्या रुपात तर कुणाला तो मार्गदर्शक शिक्षकाच्या रुपात मिळतो. कोणी स्वामी *‘भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे’* असे तो सांगतो. अन मग जीवनाचे महाभारत जिंकणे सहज शक्य होते .

९ जीवन मरण एका श्वासाचे अंतर

महाराष्ट्राची एक थोर कवयत्री बहिणाबाईने जीवन व मरण याचे वर्णन एका ओळीत केले आहे. नारद पुराणामध्ये असेच काहीसे वर्णन आढळते. एकदा महर्षि व्यास व त्यांचा मुलगा शुकदेव वेदांचे पारायण करत असताना जोराचे समुद्री वादळ आले. तेव्हा महर्षि व्यास यानी वारे व त्याचे सात प्रकार शुकदेवाना सांगितले ते असे;

१. जो वायु धुळयुक्त वायु व उष्णतेमुळे उत्पन्न होतो व जलयुक्त ढगाना इकडून तिकडे हलवतो तो वायु.

२. आवहः जो वायु वहात असताना ध्वनी किंवा वीज निर्माण करतो तो वायु.

३. उव्दहः जो वायु नदी सरोवर समुद्री पाण्याचे पर्जन्ययुक्त ढगात परिवर्तन करतो किंवा शरिरात उदान वायुच्या स्वरूपात असतो तो वायु.

४. संवहः जो वायु देव देवतांच्या विमानाना गती देतो व नील शामल ढगाना एकत्र बांधून जलवृष्टी करतो तो वायु.

५. विवहः जो विनाशकारी वायु प्रचंड वेगाने मोठमोठे वृक्ष उपटून फेकतो तो वायु.

६. परिवहः जो वायु आकाश गंगेतील पाणी प्रवाहित करतो व ज्यामुळे सुर्य किरण पृथ्वीवर पोहचतात तो वायु.

७. परावहः जीवनाच्या अंतिम क्षणी जिवंत प्राण्याच्या शरिरातून बाहेर पडणारा सर्वश्रेष्ठ व ज्यावर नियंत्रण केले असता माणुस दिर्घायु होतो तो वायु.

अशा या परावह वायुचे रहस्य आधुनिक विज्ञानाला समजावयाचे आहे. काहींच्या मते या परावह वायुचे रुपांतर प्रकाशात किंवा ध्वनीत होते. नारदपुराणातील ही माहिती नक्कीच अशास्त्रीय नाही.

१० डोळा – एक अदभुत कॅमेरा

डोळ्यांनी बघतो ध्वनी परसितो कानी, पदी चालतो ।
जिव्हेने रस चाखतो, मधुर वाचे आम्ही बोलतो ।
हातांनी बहुसाल काम करतो,विश्रांती ही घ्यावया ।
घेतो झोप सुखे, फिरून उठतो ही ईश्वराची दया॥

ईश्वराने माणसास जी पंचेंद्रिये दिली आहेत , त्यापैकी नेत्र हे सर्वात महत्वाचे इं द्रिय . कॅमेराला एकच डोळा असतो. पण माणसाला दोन डोळे असल्याने सर्व गोष्टी सापेक्ष दिसतात. वस्तुचे अंतर, लांबी , रुंदी हे समजते. पीन होल कॅमेरा व डोळा ह्यात अनेक गोष्टी समान आहेत. प्रकाश किरणे बुबुळावर पडली की ती आंत जाऊन नेत्रपटलावर (रेटिनावर) पडतात. कॅमेरात ती फोटो फिल्म वर पडतात. नेत्रपटलावर पडलेले किरण मेंदुला संदेश पाठवतात व ते मेंदुत संगहित होतात. अशा अब्जावधी गोष्टी मेंदुत साठवले जातात. आजकालच्या डिजिटल कॅमेरांत अशीच शेकडो चित्रे साठवण्याची सोय असते. कॅमे-यात शटर कमी जास्त उघडण्याची सोय असते , डोळ्याच्या पापण्या प्रकाशाच्या तीव्रतेनुसार कमी जास्त उघडतात. आधुनिक काळात इंफ्रारेड (अतिनील) कॅमेराचा शोध लागल्या ज्यामुळे अंधारात सुध्दा फोटो काढता येतात , व क्रीलिअन फोटोग्राफी मुळे व्यक्तीच्याभोबती असलेली आभा पहाता येते व त्यावरून् व्यक्तीचे आरोग्य व इतर गोष्टी समजतात. ज्ञानचक्षु सर्वांनाच असतात पण एखादाच सुरदास किंवा गुलाबराव महाराज जन्मत: प्रज्ञाचक्षु असतात आणि त्याच्या सहाय्यने असंख्य काव्यरचना करून अजरामर होतात.

११ संस्कृत शब्दकोशातील पंचांगे

प्रस्तावनाः पंचांग ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ म्हणजे पांच अंगे . आदि कालापासून मानव संख्येची गणना आपल्या पांच बोटानी करत आला आहे. लक्षात ठेवण्यासाठी नंतर तो एक एक बोट दुमडत असे. एक सारख्या पाच गोष्टी एकाच शब्दाव्दारे व्यक्त करण्यासाठी पंचांगाचा उपयोग सुरू झाला. संस्कृत शब्दकोशातील काही पंचांगे या लेखात वर्णन केली आहेत.

१-कालनिर्णयासाठी पंचांग: वार, तिथी, नक्षत्र, करण व योग म्हणजे पचांग.

- वार सात असतात,सोमवार ते रविवार. हे सर्वांनाच माहित आहेत.
- तिथी ही चंद्राच्या कलेनुसार शुक्ल प्रतिपदा ते चतुर्दशी, पोर्णिमा, नंतर कृष्ण प्रतिपदा ते चतुर्दशी व अमावास्या अशा तीस तिथ्या असतात.
- नक्षत्रे सत्ताविस असतात जशी अश्विनी ,भरणी , कृतिका , रोहिणी वगैरे
- योग हा सुर्य व चंद्राच्या कोनवर अवलबून असतो..एकुण सत्ताविस योग असतात.
- करण एका तिथी चा अर्धा भाग.

२-वनस्पती शास्त्र किंवा आयुर्वेद : वनस्पतीच्या पांच अंगानाही पंचांग असे म्हणतात. फुले, फळे, पाने, बुंधा किंवा खोड व मुळे ही वनस्पतीची पाच अंगे. बहुतांश आयुर्वेदिक औषधे याच पांच भागांपासून बनतात. जसे गुलकंद –गुलाबाच्या फुलापासून, च्यवनप्राश –आवळ्याच्या फळापासून , अश्वगंधा किंवा घृतकुमारी   –पानांपासून, अर्जुनारिष्ट-खोडांपासून , शतावरी चुर्ण   –मुळांपासून बनतात.

३-पंचलवण: पाच प्रकारचे मीठ

- सैधव –खनिज दगडापासून बनवलेले.
- समुद्र लवण – नेहमी वापरतो ते, समुद्राच्या खा-या पाण्यापासून बनवलेले
- सौवर्चल लवण –काळे मीठ किंवा सैधव. ह्या मीठाला गंधकासारखा वास येतो.
- रोमक किंवा साम्बर लवण- हे मीठ राजस्तानातील साम्बर तलावाच्या पाण्यापासून बनते
- औभिद लवण – खा-या मातीतील खडकापासून बनवलेले मीठ. ह्या सर्व प्रकारच्या मीठांचा उपयोग आयुर्वेदात सांगितला आहे.

४-पंचगव्य- गाई पासून मिळणा-या पाच वस्तु – दुध, दही, तुप, गोमुत्र व शेण . काही विशेष दिवशी (श्रावणीला) ह्याचे विधीपुर्वक सेवन केले जाते.

५ पंचमृदा- पांच प्रकारची माती. गेरू , खडूची माती , लवण माती , वारुळाची माती व सुपिक माती. अशी मातीपासून बनवलेल्या भांड्यात वितळवेल्या धातु साठवतात. किंवा अशी माती मुर्ती निर्माण करण्यासाठी वापरतात.

६ पंचमहाभूते- पृथ्वी, पाणी, अग्नी , वायु व आकाश ही तत्वे म्हणजे पंचमहाभूते. यांचा प्रकोप झाला की पर्यावरण विघडते. वेदात यांच्या स्तुतीपर अनेक सुक्ते आढळतात.

७ पंचेंद्रिये- माणसाला मिळालेली पांच इंद्रिये , ज्या द्वारे वेगवेगळ्या वस्तुची परिक्षा करता येते. ही पाच इंद्रिये म्हणजे डोळे ,नाक,कान, जिव्हा ,त्वचा . लहान मुल जन्माला आल्यापासून ह्याच इंद्रियांद्वारे आसपासच्या वस्तु ओळखावयास शिकतो . पशु पक्षी याच द्वारे एकमेकांशी सम्पर्क साधतात. काही पक्ष्याची किवा प्राण्याचीही इंद्रिये माणसांपेक्षा अधिक तीक्ष्ण असतात. जसे कुत्र्याची वास ओळखण्याची शक्ती . घुबडांची श्रवणशक्ती, घार किवा गरुडाची दृष्टी इत्यादी.

८ कर्मेंद्रिये – प्रत्येक मनुष्याला अकरा इंद्रिये असतात. त्यापैकी पाच कर्मेद्रिये - वाणी , हाथ, पाय, दोन मलमुत्र नि:सारण अवयव ,व जननेद्रिय , पाच ज्ञानेद्रिये (वर सांगितल्याप्रमाणे) व मन हे अकरावे इंद्रिय असते.

९-पंजाब – पाच नद्यानी सुपिक बनवलेला प्रदेश . झेलम ,चिनाब, रावी, व्यास व सतलज.

१०-पंचलोह – लोह म्हणजे धातु. सोने , चांदी, तांबे, शीसे व लोखंड याचे मिश्रण म्हणजे पंच लोह.. चांदी, सोने, शीसे , तांबे व लोखंड अनुक्रमे ४ ,१,८,८ व १ ह्याप्रमाणात एकत्र करून वितळवून केलेला धातु. अशा धातुपासून देव देवतांच्या मुर्ती बनवतात.

११ – पंचरत्ने – रत्ने अनेक असतात पण सुवर्ण , हिरा, पाचु, माणिक व मोती ह्यांचा उपयोग देवतांचे अलकांर बनवण्यासाठी केला जातो.

१२ – पंचाम्ल- पाच प्रकारच्या आम्बट फळांपासून बनवले आम्ल . बोर , डालिम्ब ,चिंच, लिम्बू व आम्ल वेतस (अमसुल)

१३ –पंचद्रावक – धातु लवकर वितळावा म्हणून उपयोगात येणारे औषधी पदार्थ-उदाहरणार्थ गुंज, टाकणखार,मध ,तुप व गुळ.

१४ –पंचवायु –माणसाच्या शरिरात असणारे वायु. हे वायु शरिराच्या वेगवेगळ्या अवयवाना प्रभावित करतात ते खाली दिलेल्या तक्त्यात दाखवले आहे.

वायुचे नांव	शरिराचा भाग	कार्य/ लक्षण
प्राण	डोके व छाती श्वासोश्वास	अग्रगती,चेतना
अपान	मुत्रपिंड	अधोगती व बाह्यगती

समान	नाभी	ग्रहण, दृढीकरण
उदान	कंठ	वाणी उर्ध्व गती उच्चारण
व्यय	सपूर्ण शरिर	संचार, संतुलन

संदर्भ

- हिदुत्व का संक्षिप्त शब्दकोश- स्वामी हर्षानंद, रामकृष्णा मठ बंगलोर
- रसार्णव किमया तंत्र -इंद्रदेव त्रिपाठी, चौखम्बा प्रकाशन , वाराणसी.
- भारतीय रसायन शास्त्र-श्री नाडकर्णी, धुतपापेश्वर प्रकाशन पनवेल, मुम्बई ७

१२ अथः कर्णपुराण

मनुष्याला जी पंचेंद्रिये आहेत त्यापैकी एक म्हणजे कान. हजारो वर्षांपूर्वीचे वैदिक ज्ञान "श्रुती स्मृती पुराण" या पध्दतीने टिकून राहिले असे हे कानाचे महात्म्य. "डोळ्याने बघतो ध्वनी ऐकतो ही इश्वराची कृपा "अशा अर्थाची एक कविता आहे. कानाने न ऐकू येणारे मुल बहिरे बनते. या उलट आंधळी मुले कान व स्पर्श याच्या सहाय्याने आपला मार्ग शोधतात. अनेक आंधळ्या व्यक्ती विविध कलांत प्राविण्य मिळवतात. काही चांगले गायक व संगितकार होतात. तसे कर्ण बधिर व्यक्तींचे होत नाही.

कानाचे छिद्रातून ध्वनी तरंग कर्ण पटलावर पडून मेंदूला संकेत पाठवतात. मेंदू या संकेतांचा शब्द व चित्रांशी संबध लावतो. अनोळखी भाषा आपण ऐकतो पण समजत नाही कारण त्या शब्दांचा अर्थ मेदूने अगोदर लावलेला नसतो. कुत्रा या सारख्या काही जनावरांची श्रवणशक्ती अदभुत असते. शेकडो मिटर दूरून येणारे आपल्या मालकाचे वाहन कुत्रा ओळखतो व शेपुट हलवू लागतो. गोकर्ण या वेलीचे फुल हुबेहुब गाईच्या कानासारखे दिसते.

कर्णवेध किंवा कान टोचणे हा हिंदुंच्या सोळा संस्कारापैकी नववा संस्कार. हा संस्कार वयाच्या पहिल्या पांच वर्षात करायचा असतो पण महराष्ट्रात बाळाच्या जन्मानंतर बारावे दिवशी , त्याचे दोन्ही कान टोचतात. ही छिद्रे बुजु नये म्हणून त्यात दोरा किंवा सोन्याची बारिक तार घालतात. कर्णवेधाने विध्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढते असा एक समज आहे . कर्णवेधामुळे पुरुषाना मुत्रपिंडाचे विकार (हार्निया/ हायड्रोसील) होत नाहीत व स्त्रीयाना मासिकपाळीचा त्रास कमी होतो किंवा उन्माद (हिस्टेरिया) होत नाही असे आयुर्वेदात सांगितले आहे.

पुढे या छिद्रांचा उपयोग स्त्रीया कानांतील अलंकार घालण्यासाठी करतात. ही दोन छिद्रे कमी पडतात म्हणून की काय नाक व कानाची वरची बाजु येथेही छिद्र करून घेतात.

आधुनिक शरिरशास्त्राप्रमाणे (ह्युमन अॅनोटोमी) कानाचे तीन मुख्य भाग सांगितले आहेत ते म्हणजे बाह्य, मध्य अंतर्भाग. पण सामान्य जनांच्या दृष्टीने बाह्य भाग म्हणतेच कान. या बाह्य किंवा दृष्य कानाचे तीन भाग करता येतील.

१.सर्वात वरचा भाग जेथे पुरुष भिकवाळी किंवा स्त्रीया बुगडी घालतात तो.

२.मधला भाग ज्याच्यात कानाचे नैसर्गिक छिद्र असते तो भाग.

३. सर्वात खालचा भाग जेथे स्त्रीया डुल, कर्णफुले घालतात तो.



निसर्गत: कोणत्याही दोन व्यक्तीचे कान सारखे नसतात हे सुक्ष्म निरिक्षण केले तर लक्षात येईल.

- संपूर्ण बाह्य कान: हा बहुतांशी गालाना समांतर असतो पण काहींचे कान ६० ते ९० अंशात असतात जसे गणपतीच्या मुर्तीचे कान असतात तसे. आंतरजातिय विवाहित स्त्रीयांच्या मुलाचे कान असे असतात असे आढळते.
- कानाचा सर्वात खालचा भाग: हा बहुतांशी गालापासून वेगळा किंवा सुटा असतो . पण काही जणांत हा भाग गालाशी चिटकून असतो. जसा भगवान बुध्दाचा कान. ज्ञानी माणसाचा कान असा असतो असा समज आहे.
- कानाचा सर्वात वरचा भाग: प्रौढ पुरषांच्या कानावर येथेच केस उगवतात. प्रसिध्द किंवा धुर्त पुरूषाचे हे ठळक लक्षण म्हणता येईल.
- कानाचा मधला भाग: हाच भाग कुठल्याही दोन व्यक्तीत सारखा नसतो. संपूर्ण कानाला ह्यामुळेच मजबुती येते. या तीन भागांचे सुक्ष्म अवलोकन केले तर व्यक्तीचा स्वभाव याची कल्पना करता येऊ शकेल.

१३ गज़ल – मला भावलेली व उमगलेली

गज़लेवर कांही बोलायचे म्हणजे सुरवात शेरोशायरीनेच व्हायला हवी. निदा फाजली ने म्हटले आहे,

" बाते कम किजे, जहानात को छुपाए रखिये, अजनबी शहर है, यहां दोस्त बनाते रहिए."

गज़ल या कव्य प्रकाराबाबत अनेक गैरसमज आहेत. कोणाला वाटते गज़ल म्हणजे मैखाना , साकी, शराब वगैरे, तर कोणाला वाटते गजल म्हणजे आशुक , माशुक यांच्या प्रेमाची रडगाणी. माझ्या मते गजल म्हणजे शाश्वत चिंतन , जे अनेक पाने लिहून सुध्दा व्यक्त होत नाही पण केवळ दोन ओळीत सांगता येते ते चिंतन. आजच्या या भाषणाचे मुख्य बिंदु असतील.

१ गजलेचा इतिहास,

२ व्याकरण,

३ गजलेचे प्रकार

४ कांही अजरामर शायर आणि

५ गजल गायक

६ मतला आणि मक्ता

७- मराठी गझलेचा प्रवास

१-गजलेचा इतिहास- गजले चा उगम जरी भारतात झाला नसला तरी गजल फुलली बहरली ती भारतात. सुरवातीला पर्शियन शब्द असलेली गजल भारतात उर्दु प्रचुर झाली. उर्दुला स्वत:ची अशी लिपी नाही अरेबीक किंवा देवनागरीत गजल लिहावी लागते.गजलेच्या अनेक व्याख्या आहेत. कोणाच्या मते स्रीयांशी व्यक्त केलेले मनोगत , प्रियतमेशी तारुण्यसुलभ प्रीतीच्या गोष्टी बोलणे, कोणी म्हणतात बाणाने घायाळ झालेले हरिण मरताता जो सुस्कारा सोडते तो म्हणजे गजल.

२- व्याकरण- गझलेचे व्याकरण सोपे आहे. मराठी काव्यात अनेक वृत्ते आहेत , तर गझलेत फक्त ररिफ आणी काफिया म्हणजे एक प्रकारचे यमक. पण ट ला ट म्हणजे यमक होत नाही तसेच

कांहीसे गझलेचे सुध्दा आहे , एका गझलेत ५ते ६ शेर असतात. प्रत्येक शेराची दुसरी ओळ सयमक असते. प्रत्येक शेराचा विषय वेगळा असू शकतो. पहिल्या शेराला 'मतल अ' (मतला) म्हणतात तर शेवटच्या शेराला 'मक्त अ' (मक्ता) म्हणतात. अधिक माहिती साठी सुरेश भटांचा लेख वाचावा.

३- गजलेचे प्रकार – कमीत कमी शेर असलेल्या गझलेला छोटी पहरकी गझल तर अनेक शेर (अगदी २० शेर) असतील तर तीला बडी पहर ची गझल म्हणतात. गझलचे सर्व शेर एकाच विषयाला धरून असतील तर ती गझल मुसल्लल अन्यथा ती गैर मुसल्लल ठरते.

४- कांही अजरामर शायर- जुन्या शायरांपैकी काही अजरामर शायर म्हणजे अमिर खुसरो , बहादूर शा जफर, जौक, मीर तकी मीर, मोमिन,फैज अहमद फैज, अहमद फराज आणि यांचा मुकुटमणी गालिब.त्या काळात छपाई यंत्रे नव्हती, गझल हातांनी लिहून काढत असत.

बहुदा सर्व आधुनिक भारतीय शायरांना आपल्या टोपण नांवात आपल्या गांवाचे नांव लावायला आवडते. जसे मजाज लखनवी , फिराक गोरखपूरी , साहिर लुधीयानवी , दाग देहलवी , हसरत मोवानी, कैफी आझमी वगैरे.

५- गजल गायक – कांही वेळा प्रसिध्द शायराची गजल गाऊन अखादा सामान्य गायक प्रसिध्दी मिळवतो तर काही अप्रसिध्द शायर प्रसिध्द गायकामुळे घरोघरी पोहचतात . या दोन्हींचा समसमा संयोग झाला तर ती अविस्मरणीय होते. एकच गझल अनेक गायक गायिकांना म्हणण्याचा मोह होतो. गझल जन सामान्यापर्यंत पोहचवणारे पाकीस्तानी गायक मेहदी हसन , गुलाम अली, नसरत फतेह अली , नुरजहां, मलिका पुखराज , इक्बाल बानो , आबिदा परविन . भारतीय गझल गायक म्हणजे, कुंदनलाल सैगल,बेगम अख्तर, तलत महमुद, जगजित सिंग-चित्रा सिंग, पंकज उदास .

६ मतला आणि मक्ता – गझलेचा पहिला शेर बहुदा आश्चर्याचा धक्का देतो. त्याची कांही उदाहरणे पहा,

- मरने के बाद मेरी आंखे खुली रही, आदत पडी थी उन्हे इंतजारकी.
- जिंदगी की रांहोमे रंजो गमके मेले, भीड है कयामत की फिर भी हम अकेले.

- युं न उडाओ मेरे खाक ए कब्र जलिम, यही एक रह गयी है मेरी प्यारकी निशानी.

मक्ता – गझलेचा शेवटचा शेर , यातच कवीचे टोपण नांव (तखल्लुस) असते. तुकारामाच्या किंवा नामदेवांच्या अभंगात सुध्दा तुका म्हणे किंवा नामा म्हणे असते तसेच.

७- मराठी गझलेचा प्रवास – गझल हा प्रकार मराठीत रुजु करण्याचा पहिला प्रयत्न प्रा. माधव ज्युलिअन यांनी केला पण त्यातील फारसी शब्दानी ती क्लिष्ट झाली त्यामुले तो प्रकार लोकप्रिय झाला नाही. त्या नंतर यवतमाळचे श्री भाऊसाहेब (वा.वा.) पाटणकर ह्यांनी मराठी गझलेचा प्रसार केला. पण त्याच्या बहुतेल गझल शृंगारिक असल्याने खाजगी बैठकीत दाद भरपूर मिळाली पण सभा मेहफिलमध्ये प्रभाव पाडू शकल्या नाहीत.

-

१४ मानवी शरिराशी निगडीत म्हणी व वाक्प्रचार

प्रत्येक भाषेत समर्पक म्हणी आढळतात. कांही विशिष्ठ प्रसंग वा अनुभवातून त्यांचा उगम झालेला असतो. कांही म्हणी व वाक्प्रचार मानवी शरिराशी निगडीत आहेत त्यांची उदाहरणे खालिल प्रमाणे;

केस:- १.केसाने गळा कापणे, २. माझे केस उन्हात पांढरे झालेले नाहीत.





दाढी व मिशी :- १.बिनपाण्याने हजामत करणे, २. एखाद्याची मिशी उतरवणे.



डोळे:- १.दोन डोळे शेजारी भेट नाही संसारी ,२.काविळ झालेल्याला सर्व जग पिवळे दिसते , ३. दुस-याच्या डोळ्यातले कूसळ दिसते पण स्वत:च्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही.




कान:- १. हलक्या कानाची व्यक्ती ,२.नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे ,३. एखाद्या गोष्टीकडे कानाडोळा करणे, ४. कान व डोळे यामध्ये चार बोटंचे अंतर असते.



नाक:- १. नाकापेक्षा मोती जड, २.नाकाने कांदे सोलणे, ३. नाक मुरडणे, ४. नाक कापले जाणे, ५. नकट्या नाकाला राग फार, ६. नाक कापून अपशकून करणे.




दांत व ओठ :- १.आपलेच दांत व आपलेच ओठ , २.दांत कोरून पोट भरणे , ३. त्याचेच दांत त्याच्याच घशांत, ४. एखाद्याचे दांत पाडणे, ५. उगाचच दात दाखवणे.



जीभ :- १. उचलली जीभ लावली टाळूला, २. उगिचच जीभ वळवळणे, ३. जीभेचे चोचलेच फार, ४. खोटे बालले तर जीभ झडेल, ४. नावडतीचे मीठ अळणी.



हातः- १. हात खाजवणे २.जीचे हाती पाळण्याची दोरी ती जगा उध्दारी , ३. हाताची सर्व बोटे सारखी नसतात. ४. हाती भिकेची वाटी.



पायः- १. लाथ मारीन तेथे पाणी काढिन, २. पायपीट करणे, ३. पायाचे तुकडे पडणे, ४. अडला हरि गाढवाचे पाय धरी, ५. पायाने लाथाडणे.



नख:- १. गळयाला नख लावणे, २. नखाची सर न येणे, ३. नखायेवढे पोर,



अंगठा:- १. अंगठा दाखवणे, २. अंगठा उठवणे,




पाठ:- १. पाठीला पाठ लावून येणे, २. पाठ फिरवणे /दाखवणे



सारांश- वरिलपैकी बहुतांश म्हणी स्रीयांच्या तोंडी शोभून दिसतात. ह्या म्हणीशी साधर्म्य असलेलया इतर भाषेतील म्हणी शोधणे मनोरंजक ठरेल.

१५- शिल्पशास्त्राशी निगडीत मराठी म्हणी व वाक्प्रचार

शिल्पशास्त्रावरिल एका मराठी पुस्तकाचे संकलन करताना कांही त्या विषयाशी निगडीत मराठी म्हणी व वाक्प्रचार लक्षात आले ते वाचकांना मनोरंजक वाटतील.

प्राचीन भारतीय शिल्पशास्त्रात दहा उपशास्त्रे सांगितली आहेत ती खालिल प्रमाणे

१-कृषिशास्त्र- यात वृक्षविध्या , पशुविद्या व मनुष्यविद्या व इतर २१ कलांचा समावेश आहे , त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा,

- वडाची साल पिंपळाला,
- एक हात लाकुड सात हात झिलपी,(अतिशयोक्ती)
- कु-हाडीचा दांडा गोत्यास काळ,
- शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी,
- पिकले पान गळायचेच, (मृत्युवरची एक प्रतिक्रिया)
- फुलांचा गंध मातीला,
- पाळे मुळे खोल जाणे,
- पळसाला पाने तीनच,
- कोल्ह्याला द्राक्षे आंबट

२- जलशास्त्र-यात स्तंभन , संचेतन व संहरण अशा तीन विद्या व कलांचा समावेश आहे , त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा,

- साचलेले पाणी किती दिवस पुरणार ?
- तळे राखिल तो पाणी चाखेल,
- नव-याने मारले व पावसाने झोडपले त्याची तक्रार कशी करणार.
- कुठेतरी पाणी मुरते आहे.
- वाहत्या पाण्याला बांध घालणे .

३- खनिशास्त्र- दृती , संकर , पृथ:करण व भस्मीकरणविद्या अशा चार विद्या व कलांचा समावेश आहे, त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा,

- खाण तशी माती.
- मऊ लागले म्हणून कोपराने खणू नये (कोणाच्या सौजन्याचा गैरफायदा घेऊ नये)
- खरा रत्नपारखीच हिरा ओळखु शकतो.
- उडदामाजी काळे गोरे (सर्व भ्रटाचारी सारखेच कोणी कमी तर कोणी जास्त)
- कोळसा कितीही उगाळला तरी काळाच .(मुळ स्वभाव जात नाही)
- कसोटीवर उतरणे, (व्यक्तीची पारख करणे)
- सोने तावल्याशिवाय शुध्द होत नाही.
- कच्चे मडके. (ज्याला आकार देता येतो)

४.रथ शास्त्र , ५.नौका व ६.विमान शास्त्र अशी तीन शास्त्रे साधन खंडात येतात . त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा.

- जगंनाथाचा गाडा सर्वांनी ओढा,
- पालखी (तिरडी) उचलली गेली.
- लगाम लावणे, लगाम हाती घेणे.
- शीडात हवा भरणे.
- नाव बंदराला लागणे.(संसारात पडणे)
- एखाद्याचे विमान उंच जाणे (दारू पिऊन).

७- वास्तुशास्त्र –यात वासो विद्या (तंबू) , कुट्टी विद्या (झोपडी) , प्रासाद (घरे) व राजालय (महाल) अशा विद्या व कला येतात. त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा.

- पाहुण्याने तर तंबू ठोकला.
- उंट तंबून शिरला व मालकाला बाहेर काढले.
- वास्तु देवता सतत तथास्तु म्हणत आसते (म्हणून अमंगल गोष्टी उच्चारू नयेत.)
- भिंतीलाही कान असतात.(घरच्या खाजगी परक्या समोर बोलू नयेत.
- गुण्या गोविंदात रहा. (घराच्या भिंती गुण्यात- काटकोनात व ओळंब्यात –गोविंदात असतील ते घर दीर्घ काळ टिकते) .
- डोईजड होणे (लहान दगडावर मोठा दगड रचला गेला तर ती भिंत कोसळते.

- भिंतीचे पोपडे पडणे वा रंग उडणे (सांपत्तीक परिस्थिती खालावणे.
- पाया मजबूत करणे (एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करणे)
- लंकेत सोन्याच्या विटा (परक्याचे धन आपल्या काय कामाचे?)
- घरोघरी मातीच्याच चुली.
- माझे घर म्हणजे गरिबाची झोपडी.
- तुळस असावी अंगणी (मांगल्याचे प्रतिक)
- छप्पर उडणे (आई वडिलाचे छत्र हरविणे)

८- प्राकार शास्त्र – दुर्ग, कूट, युध्द व व्युहरचना अशा विद्यांचा समावेश असलेले हे शास्त्र. त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा.

- कडेकोट बंदोबस्त करणे.
- गड काबिज करणे.
- दुस-यासाठी खंदक खोदणे.
- चोहो बाजूने कोंडी होणे.
- व्युहरचना करणे (निवडणुक जिंकण्यासाठी)
- गोष्टी सांगेन युक्तीच्या पण शस्त्र हाती घरणार नाही.
- शरणागताला अभय देणे (विदूराची युध्द नीति)

९- नगररचना शास्त्र – यात पाणी व्यवस्था , रस्ते, बाजार, स्मशान इत्यादि विषय येतात. त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा.

- आधी पाणी मग बोलणी (पाण्याचे दुर्भिक्ष असालेल्या गावात वधुपिता आपली मुलगी देत नाही.
- साठवलेले पाणी किती दिवस पूरणार?
- वाकडी वाट करून येणे
- जाणा-याला दहा दिशा (रस्ते)
- कलेचा बाजार मांडणे (नीतिमत्ता सोडून)
- कचराघर करणे (अनावश्यक गोष्टी जमवणे

- स्मशान वैराग्य (तात्पुरती विरक्ती)
- आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी.
- राजमार्ग पत्करणे.(योग्य दिशा धरणे)
- आपली वहिवाट सोडू नये (सर्वच जून्या प्रथा मोडू नये.)
- यशाचा मार्ग खडतर असतो.

१०- यंत्रशास्त्र – यात कोणतीही विद्या किंवा कला नसली तरी सर्व इतर शास्त्रांशी निगडिता आहे. त्या वर आधारित प्रसिध्द म्हणी अशा. कुठल्याही यंत्राचे पाच घटक म्हणजे – १. दंड. २. चक्र,३. दंत, ४. सरणि व ५.भ्रमण म्हणजे अनुक्रमे लिव्हर, व्हील, गिअर ,चेन आणि स्कृ .

- नशिबाचा फेरा कधी वर कधी खाली (रहाट गाडग्याप्रमाणे)- सरणि
- अडकित्यात सापडणे. (दंड)
- आयुष्याचे चक्र फिरत राहणे (कितीही संकटे येऊन गेली तरी ,(चक्)
- माळ जपणे (सरणी).
- मेंदुचा स्कृ ढिला असणे (भ्रमण).
- मोडेन पण वाकणार नाही (पहार –दंड)

लेखक परिचय

प्राध्यापक अशोक सदाशिव नेने



- बी.ई. नागपूर, एम.ई, पीएच. डी. रुडकी विश्वविद्यालय.
- अध्यापन (३० वर्ष) विश्वेश्वरय्या राष्ट्रिय अभियांत्रिकी संस्थान, नागपूर.
- १५० पेक्षा अधिक शासकिय व अशासकिय प्रकल्पांचे मृदा अभियांत्रिकी सल्लागार.
- विद्यार्थीसाठी स्वयंशिक्षण योग्य ६ संगणकिय सॉफ्टवेअर चा विकास
- प्राचीन भारतीय शिल्पशास्त्र विषयावर ४ मुद्रीत तथा १५ ई बुक प्रसिध्द. त्यालील एक पुस्तकाचा पॅरिस येथिल कालमंजुषा मध्ये समावेश .
- ५० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाधित..
- शोधकार्य मार्गदर्शन- ३ विद्यार्थी पीएच. डी. आणि २ विद्यार्थी एम.ई, उपाधी प्राप्त.
- एक आंतरराष्ट्रीय परिषद समितीचे ४ वर्ष आमंत्रित सदस्य .
- २ आंतरराष्ट्रीय व १० राष्ट्रीय संमेलनामध्ये आमंत्रित वक्ता.